**अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे**
**पुणे विद्यापीठ चौक, मॉर्डन लॉ कॉलेजच्या शेजारी, पाषाण रोड, पुणे ४११००८**
**सांख्यिकी शाखा**

**जाहिरात क्रमांक CID/ एम.सी.आर.- २०२१ /१९२/ २०२१ पुणे दिनांक ३१/०३/२०२१**

मा. पोलीस महासंचालक म.राज्य मुंबई यांचे मान्यतेने अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे या कार्यालयाअंतर्गत नवीन अदयावत एम.सी.आर फॉरमॅट तयार करण्यात आलेला आहे. त्याकरीता नवीन सॉफटवेअर तयार करणेकरीता २ लिफाफा दरपत्रक पध्दतीने खाली विहीत केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहुन नोंदणीकृत व मान्यता प्राप्त व्यावसायिक कंपन्यांकडुन सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे. खालील नमुद जाहिरातीनुसार स्वतंत्रपणे दरपत्रके सादर करावीत.

| जाहिरात क्रमांक | जाहिरात तपशिल |
|---|---|
| | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे या कार्यालयांतर्गत तयार करण्यात येणा-या अदयावत एम.सी.आर. सॉफटवेअर तयार करणेबाबत |

**दरपत्रक प्रक्रियेचा संपुर्ण तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तपशिल | वेळापत्रक |
|---|---|---|
| १ | अटी व शर्ती डाऊनलोड करण्यास उपलब्ध | या कार्यालयाचे संकतस्थळ www.mahacid.gov.in |
| २ | दरपत्रक मागविण्याचा दिनांक | दिनांक ३१/०३/२०२१ ते दिनांक ०६/०४/२०२१ |
| ३ | दरपत्रके दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०६ /०४/२०२१ रोजी सायं. १७ .०० वाजेपर्यंत |
| ४ | दरपत्रके उघडण्याचा दिनांक | दिनांक ०७/०४/२०२१ रोजी तसेच काही अपरिहार्य कारणामुळे निविदा उघडण्याचा पुर्ण अधिकार अपर पोलीस महासंचालक., गुन्हे अन्वेषण म.राज्य, पुणे या कार्यालयाने राखुन ठेवलेले आहेत. त्याबाबत शुध्दीपत्रकाद्वारे संबंधितांना कळविण्यात येईल. |
| ५ | दरपत्रके सादर करण्याचे ठिकाण | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे विद्यापीठ चौक - ४११००८ दुरध्वनी क्र २० - २५६३८४४७. |
| ६ | दरपत्रकांचे अटी व शर्ती, दरपत्रके दाखल करण्याची पध्दत, तांत्रिक लिफाफा, व्यावसायिक लिफाफा बाबतची सविस्तर माहिती | सोबत पी.डी.एफ. फाईल जोडण्यात आलेली आहे. ते या कार्यालयाचे वर नमुद संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन घ्यावे व त्यानुसार दरपत्रके मुदतीत सादर करावेत. मुदतीत सादर न होणा-या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही. |
| ७ | संपर्क अधिकारी नाव व पदनाम संपर्क क्रमांक | श्री. एम.ए.हारपुडे, पोलीस उप अधीक्षक, सांख्यिकी शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे, मो.नं. ९८७०२१७९२६ |

( पल्लवी बर्गे )
पोलीस अधीक्षक, ( का. व सं.)
गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे

Scanned with CamScanner

**अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे**
**पुणे विद्यापीठ चौक, मॉर्डन लॉ कॉलेजच्या शेजारी, पाषाण रोड, पुणे ४११००८**
**सांख्यिकी शाखा**

**क्र. गुअवि / सांख्यिकी / जाहिरात प्रसिध्दी / दरपत्रके** **पुणे दिनांक ३१/०३/२०२१**

विषय- अद्यावत एम.सी.आर सॉफ्टवेअर तयार करणेबाबत.

******

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म. राज्य, पुणे या कार्यालयांतर्गत एम.सी.आर. सॉफ्टवेअर तयार करण्याकरीता. २ लिफाफा दरपत्रक पध्दतीने खाली विहीत केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहुन नोंदणीकृत व मान्यता प्राप्त व्यावसायिक कंपन्यांकडुन सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**अ ) अटी व शर्ती -**

१. कराराचा कालावधी हा वार्षिक कालावधीकरीता राहील.
२. सदरचे सॉफ्टवेअर किं रु ३,००,०००/- ( तीन लाखाच्या) मर्यादेत राहील याची नोंद घ्यावी.
३. दरपत्रक खरेदीप्रक्रिया अंतर्गत दरपत्रके करतांना रक्कम सर्व करांसह सादर करावी.
४. कामाच्या अनुषंगाने कार्यालयातील कामकाजाशी संबंधित अधिकारी यांचेशी योग्य समन्वय ठेवणे, सहकार्य करणे व त्यांच्या सुचनांचे पालन करुन काम पुर्ण करणे बंधनकारक राहील. देखभाल दुरूस्ती करीता सबंधीत ठिकाणी भेट देवुन कामाची पुर्तता करावी लागेल.
५. या कार्यालयाचे अधिकृत अधिका-यांनी देखभाल दुरूस्ती बाबत समाधानकारक अहवाल देवुन स्वाक्षरी केल्यानंतरच देयके पारित केली जातील.
६. सेवाकार्ड आपले तर्फे केले जातील. तसेच त्यावर काम झाल्यानंतर कार्यालयीन अधिकारी / अंमलदार सही करतील.
७. दुरूस्तीस नेमलेल्या तज्ञांची चारित्र्य पडताळणीकरीता आवश्यक कागदपत्रे तात्काळ सादर करणेत यावी.
८. मंजुर निविदाकराने निविदेच्या रकमेच्या १०% इतकी बँक गॅरंटी ०८ दिवसात या कार्यालयात जमा करावी.
९. सदर कामाच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या तक्रारीबाबत कळविल्यानंतर ०८ तासात निवारण करणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास करार रकमेच्या १% दंड देय होणा-या रकमेतुन वसूल करण्यात येईल.
१०. वरील अटी व शर्तीनुसार रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर १० दिवसाच्या आत करार करणेत यावा. करारासाठी येणारा खर्च आपण करावा.

**ब ) निविदा दाखल करण्याची पध्दत -**

सदर निविदा ही इच्छुकांनी सिलबंद दरपत्रके अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, विद्यापीठ चौक, मॉडर्न लॉ कॉलेज शेजारी, पाषाण रोड, पुणे येथे २ लिफाफा ( तांत्रिक / व्यावसायिक ) पध्दतीने सादर कराव्यात. तसेच सदर निविदा www.mahacid.gov.in या वेब पोर्टलवर फक्त download करण्यासाठी उपलब्ध आहे.

Scanned with CamScanner

**लिफाफा क्र. १ मध्ये तांत्रिक माहिती खालील प्रमाणे देण्यात यावी.**

**निविदा करांनी सोबत जोडायची कागदपत्रे**

a) निविदाकार कंपनीचे पुर्ण नाव व पत्ता दुरध्वनीसह
b) निविदाकार कंपनीचे मालकाचे / भागीदारांचे / संचालकाचे पुर्ण नाव व पत्ते दुरध्वनीसह
c) निविदाकार कंपनीचे व्यावसाय नोंदणी प्रमाणपत्र ( Company incorporation/shop Act )
d) निविदाकार कंपनीचे मालकाचे PAN Card / TAN Card
e) निविदाकार कंपनीचे मागील ३ वर्षाचे Income Tax Return.
f) निविदाकार कंपनीचे वस्तु व सेवाकर ( GST ) Registration Certificate.
g) सदर कामाच्या वार्षिक देखभाल व दुरूस्तीचे शासकीय व निमशासकीय संस्थेमधील कामाचा अनुभव आवश्यक त्या कागदपत्रांसह ( सोबत work order / Purchase Order जोडणे बंधनकारक )
h) निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक व मालकाचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी व निमसरकारी कार्यालयामध्ये फसवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतेही चौकशी चालु / प्रलंबीत नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळया यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र रू १०० /- च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक आहे.
i) निविदा बयाना रक्कम रू ५५००/- भरणा ( Demand Draft ) जोडणे बंधनकारक आहे.

**लिफाफा क्र. २ व्यावसायियिकमध्ये सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे दर सादर करण्यात यावे.**

एम.सी.आर. नवीन अद्यावत सॉफ्टवेअर

१. तयार करावयाच्या एम.सी.आर. सॉफ्टवेअर बाबतची नवीन फाईल/ माहिती ही सांख्यिकी शाखा गु.अ.वि. पुणे या कार्यालयात प्राप्त होईल.
२. उपरोक्त नमुद केलेल्या पध्दतीने सादर न झालेल्या निविदा नाकारण्यात येतील कृपया नोंद घ्यावी.
३. ज्या निविदाकाराची तांत्रिक छाननी / खरेदी समितीने मंजुर केलेली असेल त्यांचीच व्यावसायिक निविदा (दरपत्रक) उघडण्यात येईल.
४. निविदे संदर्भात सर्व निर्णय मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि. म.राज्य, पुणे हे घेतील व ते निविदाकारांवर बंधनकारक राहिल.
५. निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क तसेच कोणतेही कारण न देता सदर निविदा प्रक्रिया पुढे ढकलने किंवा रद्द करणे याचे सर्व अधिकार मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि. म.राज्य, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. तसेच अशा मंजुर किंवा नामंजुर निविदेबाबत कोणतेही स्पष्टीकरण अपोमसं, गुअवि, पुणे हे निविदाकरांना देणार नाहीत.
६. अपात्र निविदाकारांची बयाना रक्कम, सर्व प्रक्रिया पुर्ण झालेनंतर परत करण्यात येईल.
७. निविदेमधील दर हे संपुर्ण करार कालावधीसाठी बंधनकारक असतील. कोणत्याही कारणाने त्यामध्ये वाढ देण्यात येणार नाही.
८. कोणत्याही निविदेतील कोणतेही दर बाजारभावापेक्षा जास्त किंवा खुप कमी असतील तर अशा निविदांचा विचार केला जाणार नाही.
९. निविदेमधील सर्व दर हे सर्व करांसहित असावेत. कर रचना बदलल्यास त्यासाठी वेगळे पैसे देण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

( पल्लवी बर्गे )
पोलीस अधीक्षक, ( का. व सं.)
गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

Scanned with CamScanner